मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

१४०४४

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे

विषय ___

दा. क्र. १४०४४

IRBK-0114044

दा. क्र. ७४०४४

# वानवळा

म. प्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ........ नों. दि ..........
वि. ..........

शेजारच्या तीन देशांतील
मुलांना आवडणाऱ्या
गोष्टी

संकलन
यदुनाथ थत्ते

... संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा
अनुक्रम ........ वि ........
क्रमांक ........ नोंद दि ........
IRBK-0114044

साधना प्रकाशन पुणे

प्रथमावृत्ती
जून ११, १९६५
साने गुरुजी स्मृतिदिन
प्रकाशक
प्रभाकर सिद्ध
साधना प्रकाशन
४३०-३१ शनिवार पेठ, पुणे
मुद्रक
वि. नी. पटवर्धन
साधना प्रेस
४३०-३१ शनिवार पेठ, पुणे
© साधना ट्रस्ट
मुखपृष्ठ व सजावट
गंगाधर ताटके
किंमत
८० पैसे

साधना कुमार अंक १९६५ वरून पुनर्मुद्रित

ब्रह्मदेशची कथा

# खट्याळ बेडूक !


एक होता ससा आणि एक होता बेडूक ! गोजिरवाणा ससा सर्वांचा होता आवडता. ससा फार फार हुशार आहे, असे जो तो म्हणे. त्यामुळे बेडकाला सशाचा फार राग यायचा.

बेडकाने विचार केला, ससोबा इतका शेफारला आहे काय ? त्याची एकदा चांगलीच खोडकी जिरवू या ! सारे जंगल त्याच्याकडे पाहून फिदी फिदी हसेल, अशी त्याची फजिती करू या !

एक दिवस काय झाले, ससा ऐटीने रस्त्याने येतो आहे, असे बेडकाला दिसले. तो म्हणाला : " बरे सापडले आहेत बच्चमजी तावडीत ! आता पाहतोच हुशारीची परीक्षा. " मग बेडूक लपला एका दगडाच्या आड.

सशाला काहीच कल्पना नव्हती.






ससा जसा जवळ आला तसा बेडूक ओरडला, "वँग वँग !"

ससा दचकला आणि एकदम तो टुणकन् फूटभर उंच उडाला आणि मग धूम पळत सुटला. पळता पळता वाटेतल्या एका भोपळ्याला लागला त्याचा धक्का !

त्या धक्क्यासरशी भोपळा लागला उतारावरून गडगडायला !


मधे होते एक मोहरीचे रोप. त्याची बोंडे खुळखुळे वाजवीत होती. भोपळ्याच्या धक्क्याने रोपट्याला बसला





हादरा आणि जिकडे तिकडे मोहरीचे दाणेच दाणे उडाले.
तिकडून जात होते एक रानपाखरू.
रानपाखराच्या डोळ्यांत मोहरीचे दाणे उडाले आणि त्याला काही दिसेना!
इतक्यात एक बांबू लागला त्याच्या पायाला. आणि ते रानपाखरू बांबूवर आदळले.
त्याच्या धक्क्याने बांबूचे कांडे काडकन् मधेच तुटले.
बांबूखाली एक साप वेटोळे घालून आरामात ऊन खात बसला होता. त्याच्या पाठीवर ते बांबूचे कांडे पडले!
घाबरून साप सैरावैरा सरपटू लागला.
जवळच एक डुक्कर मजेत काकडीशी खेळत बसले होते. साप जवळ येतोसे पाहून ते घाबरले आणि काकडी घेऊन धूम पळायला लागले. तलावाच्या काठाकाठाने





पळायच्या धांदलीत त्याच्या दातातून काकडी निसटली आणि जवळच्या तळ्यात पडली! पाणी उसळले!!



त्या तळ्यात रहात होता एक नाग.

तो निवांतपणे तळाशी लोळत होता.

काकडी पडल्यामुळे तलावाचे पाणी हलले व त्याची झोप मोडली.




नाग फार रागावला. तो त्या काकडीला म्हणाला : "माझी झोप मोडलीस काय? थांब तुला चांगला फटका देतो." काकडी म्हणाली : "नको रे बाबा, मी काही तुला त्रास दिला नाही. त्या डुकराने मला तलावात ढकलून दिले. त्याला काय करायची ती शिक्षा कर."



नागा आला पाण्याच्या बाहेर आणि गेला डुकराकडे. डुकराचा कान धरून त्याला त्याने विचारले : "काय रे, उतलास, मातलास काय? माझी खोडी का केलीस? माझी झोप का मोडलीस? काकडीला माझ्या अंगावर का लोटलेस? थांब तुला चांगला चोप देतो."

डुक्कर म्हणाले : "नको रे बाबा. काकडीला मुद्दाम मी तुझ्या घरात ढकलले नाही. मी तुझा अपराध केला नाही. साप माझ्या रोखाने चालून आला. मी फार फार घाबरलो. धावताना काकडी पाण्यात पडली. आणि तुला त्रास झाला. शिक्षा करायची असेल तर तू त्या सापाला कर. माझा गुन्हा काहीच नाही."

नागाने डुकराला सोडून दिले आणि तो गेला सापाकडे. घाबरून साप पुढे पळायला लागला. नागा त्याचा



पाठलाग करीत होता. शेवटी नागाने त्याची गर्दन पकडली. म्हणाला : "कुठे पळतोस रे चोरा ! त्या डुकराच्या अंगावर का धावून गेलास ? डुक्कर त्यामुळे घाबरले. त्याच्या दातातून काकडी माझ्या तलावात पडली. माझी झोपमोड केलीस आणि आता बिळात घुसायसाठी पळतोस काय ?"

साप म्हणाला : "नाही महाराज, माझा गुन्हा काहीच नाही. काकडीला डुकराचा धक्का लागून ती तळ्यात पडली. डुक्कर मला भ्यायल्यामुळे धावले, त्यामुळे त्याच्या हातून काकडी निसटली. माझ्या अंगावर बांबूचे कांडे अचानक पडले त्यामुळे घाबरून मी सैरावैरा पळू लागलो. माझा गुन्हा काहीच नाही. बांबूच्या कांड्याला सजा करायची तर करा."

नागा गेला बांबूच्या कांड्याकडे. "कांड्या कांड्या, तू सापाच्या अंगावर का कोसळलास ? त्यामुळे साप घाबरला. सैरावैरा सरपटायला लागला. त्यामुळे डुकराला भीती वाटली. ते पळायला लागले. पळताना त्याच्या हातातली काकडी निसटली. तलावात गडगडली. माझी झोप त्याने मोडली. मी आता तुला चांगली अद्दल घडवणार."

बांबूचे कांडे म्हणाले : "माझा गुन्हा काही नाही. एका रानपाखराने मला धडक दिली. त्यामुळे मी खाली

पडलो. त्यामुळे सापाला भीती वाटली आणि तो सैरावैरा सरपटू लागला. तो आपल्याला चावेल म्हणून डुक्कर भ्यायले. पळताना डुकराच्या हातातून काकडी निसटली तळ्यात पडली. सजा करायची तर त्या रानपाखरालाच करा."

नागा गेला रानपाखराकडे. म्हणाला : "रानपाखरा, तुला मी चांगली अद्दल घडवणार आहे. तू बांबूला धडक दिलीस. बांबूचे कांडे खाली पडले. त्यामुळे साप घाबरून पळायला लागला. त्याला पाहून डुक्कर घाबरले. त्याच्या हातातली काकडी निसटली. ती माझ्या घरात पडली. त्याने माझी झोप मोडली. आता मी तुला सजा करणार." रानपाखरू म्हणाले : "महाराज, माझा गुन्हा काहीच नाही. उडता उडता माझ्या डोळ्यांत मोहरीचे दाणे उडाले. मला क्षणभर दिसेनासे झाले. त्यामुळे मी बांबूवर धडकलो. बांबूचे कांडे तुटले. सापाजवळ पडले. साप घाबरला. सैरावैरा सरपटू लागला. डुकराला भीती वाटली. धावताना त्याच्या हातून काकडी निसटली आणि त्यामुळे तुमची झोप मोडली. सजा करायची तर तुम्ही त्या मोहरीच्या रोपाला खुशाल करा."

नागा गेला मोहरीच्या रोपाकडे. म्हणाला : "रोपा रोपा, तुझा मी चोळामोळा करतो थांब. तू मोहऱ्या उधळल्यास.

त्या रानपाखराच्या डोळ्यांत गेल्या. रानपाखराने बांबूला धडक दिली. बांबूचे कांडे मोडले. सापापाशी पडले. साप त्याने घाबरला. सैरावैरा सरपटू लागला. त्यामुळे डुकर घाबरले. भिऊन पळू लागले. त्याच्या हातातली काकडी तळ्यात पडली. त्याने माझी झोप मोडली. तूच आहेस गुन्हेगार!" रोप म्हणाले : "माझा काही गुन्हा नाही. मी आपला वाऱ्याने डोलत होतो. तेवढ्यात भोपळा माझ्या अंगावर आदळला. त्यामुळे मोहऱ्या पाखराच्या डोळ्यांत उडाल्या. पाखरू बांबूवर आदळले. बांबूचे कांडे पडले. त्याने साप घाबरला. सैरावैरा सरपटू लागला. डुकराला भीती वाटली. ते पळू लागले. पळताना त्याच्या हातातली काकडी निसटली. तळ्यात पडली. त्याने तुमची झोप मोडली. आपले जाऊन भोपळ्याला शिक्षा करा."

नागा गेला भोपळ्याकडे. म्हणाला : "अरे अरे भोपळ्या; पाहतोस काय मजा ? तुला द्यायला आलो आहे मी सजा. तू मोहरीच्या रोपावर जाऊन का आदळलास ? त्याने रोप हलले. मोहऱ्या इकडे तिकडे उधळल्या. रान-पाखराच्या डोळ्यांत घुसल्या. रानपाखरू बांबूवर आदळले. त्याचे कांडे तुटले. सापावर पडले. साप घाबरला. सैरावैरा सरपटू लागला. डुकराला त्याची भीती वाटली. ते घाबरून पळायला लागले. त्याच्या हातची काकडी

निसटली. तळ्यात पडली. माझी झोप त्याने मोडली. मी आता तुला सजा करणार."

भोपळा म्हणाला : " नको रे बाबा, माझा काही अपराध नाही. मी आपला निवांत बसलो होतो. इतक्यात सशाने माझ्या अंगावर उडी मारली. त्यामुळे मी गडगडत गेलो. माझा धक्का मोहरीच्या झाडाला लागला. त्याच्या मोहऱ्या रानपाखराच्या डोळ्यांत उडाल्या. त्याची धडक बांबूला बसली. बांबूचे कांडे सापाच्या अंगावर पडले. साप आपल्या अंगावर येतो असे पाहून डुक्कर घाबरले. डुकराच्या हातून काकडी तुमच्या अंगावर पडली. त्यामुळे तुमची झोप मोडली. सशाचा हा सगळा खोडसाळपणा आहे. हवी तर त्याला करा सजा."

मग नागा गेला सशाकडे. म्हणाला : " ससोबा, ससोबा तुम्ही फार मातलेले दिसता. तुम्ही भोपळ्याच्या अंगावर उडी मारली. भोपळा गडगडत मोहरीच्या झाडावर आदळला. त्याच्या मोहऱ्या रानपाखराच्या डोळ्यांत उडाल्या. रानपाखरू बांबूवर आदळले. त्याचे कांडे सापाच्या अंगावर पडले. साप घाबरून सैरावैरा सरपटू लागला. डुकराला वाटले तो आपल्याला चावायलाच आला. डुक्कर घाबरून पळू लागले. त्याच्या हातातली काकडी तळ्यात पडली. त्यामुळे माझी झोप मोडली. थांब आता तुझी चांगली खोडकी मोडतो ! "


ससा म्हणाला : “ दगडामागे दडलेला राक्षस वँगवँग ओरडला. त्यामुळे मी घाबरून टुणकन् उडी मारली. त्याचा धक्का भोपळ्याला लागला. भोपळ्याची टक्कर मोहरीच्या रोपाला लागली. मोहऱ्या इकडे तिकडे उडाल्या. रानपाखराच्या डोळ्यांत गेल्या.... त्याची धडक बांबूला लागली. बांबूचे कांडे खाली पडले. साप त्यामुळे घाबरला. सैरावैरा सरपटू लागला. डुकराला वाटले तो आपल्याला चावायलाच आला. घाबरून तो पळायला लागला. त्याच्या हातातली काकडी पाण्यात पडली आणि त्याने तुमची झोप मोडली. त्या राक्षसालाच तुम्ही सजा करा. ”

नागा त्याच्यावर चिडला. म्हणाला : “ दाखव बरे कुठे आहे राक्षस ?” त्याने सशाचा कान धरला आणि पुन्हा म्हणाला : “ चल दाखव कुठे आहे तो राक्षस ! ”
ज्या दगडामागून आवाज आला होता त्या दगडाकडे ससा नागाला घेऊन गेला. ससा थरथरत होता त्याचे तोंड, नाक सारखे भिरकत होते. मिशा सारख्या हालत होत्या.

नागाने तो दगड इकडे तिकडे हलवून पाहिला. पण कुठे काय ! ससा आणखीनच घाबरला. त्याच्या नाकपुड्या आणि तोंड तसेच सारखे उडू लागले. नागाने दरडावले, “ खोटारड्या ! ” त्याबरोबर सशाची आणखीनच

घाबरगुंडी झाली. तेव्हा नागाचा राग गेला आणि तो मोठमोठ्याने हसू लागला. सशाचे नाक, तोंड आणि मिशा मात्र सारख्या हलतच होत्या, उडतच होत्या! नागाला त्याची मोठी गंमत वाटली आणि तो तसाच आपल्या तळ्याकडे परत गेला.

पण सशाचे नाक, मिशा आणि तोंड तेव्हापासून जे थरकू लागले ते अजूनही थरकतानाच दिसते !



सिलोनी कथा

# राजा सिंहबाहु



फार फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे.
गंगा नदीच्या किनाऱ्यावर वंग नावाचे एक शहर होते.
या शहरात एक राजा राज्य करीत होता.
त्याचे नाव होते सिंहबाहू.
सिंहासारखे बलवान हातपाय असणारा.
त्याचे वडील सिंह होते असे लोक म्हणत !
सिंहबाहूला एक मुलगा होता. त्याचे नाव होते विजय.
विजय युवराज असल्याने गादीचा तोच वारस होता.

परंतु विजयला वाईट संगत लागली.
तो सरळ मार्गाने वागेनासा झाला.
लोकांना विजयची भीती वाटू लागली.
तो चांगला राजा होणार नाही, असे ते म्हणू लागले.
शेवटी त्यांनी राजाला जाऊन सांगितले की, विजयला कोणत्याही परिस्थितीत तुम्ही राज्यावर बसवू नका.
राजाने प्रजेची इच्छा मानली.
त्याने अतिशय दुःखाने राजकुमाराला निरोप दिला.
राजकुमाराबरोबर त्याचे सातशे मित्रही निघाले.
सर्वजण एक जहाजात बसले.
जहाज चालू लागले.
जहाज निघाले आणि एकाएकी वादळ सुरू झाले !
जहाज हिंदोळू लागले.
हेलकावे खाऊ लागले.

कुणीकडच्या कुणीकडे जाऊ लागले.

दिवस गेले.

रात्री गेल्या.

जमीन कुठे दिसेना.

पण त्या मंडळींनी धीर सोडला नाही.

सुकाणू सांभाळीत जहाज हाकारीतच ते राहिले.

काही दिवसांनी त्यांना एका छोट्या बेटाचा किनारा दिसला.

सगळ्यांना मोठा आनंद झाला.

जहाज किनाऱ्याच्या रोखाने त्यांनी हाकारले.

अखेरीस एकदाचा किनारा त्यांनी गाठला!

हे बेट यक्षांचे होते.

कुवेणी नावाची एक यक्ष स्त्री त्या बेटावर राज्य करीत होती.

वादळाच्या तडाख्यात सापडून थकले भागलेले हे प्रवासी तिच्या नजरेला पडले.

ते सगळे किनाऱ्यावरच्या वाळवंटात आराम करीत आहेत असे तिला दिसले.

तिला त्यांची धास्ती वाटली.

या लोकांना बेटावर राहू देता उपयोगी नाही, असे ती मनाशी म्हणाली.

त्यांचा काटा काढायचा, असे तिने ठरवले.



काही वेळाने त्यांचा थकवा जाईल.
ती ताजीतवानी होतील.
अन्नपाण्याचा शोध घेऊ लागतील.
असा मनाशी कुवेणीने आडाखा बांधला.
मग तिने एक डाव टाकला.
आपल्या एका विश्वासू चाकराला तिने बोलावले.
त्याला एका कुत्र्याचे रूप दिले.
कुत्र्याने त्या प्रवाशांचे लक्ष वेधून घ्यायचे, असे त्याला तिने बजावले.
मग तिने स्वतः एका म्हाताऱ्याचे सोंग घेतले.
तलावाजवळ एका झाडाखाली ती जाऊन बसली.
विजयबरोबरच्या एका माणसाची नजर त्या कुत्र्यावर पडली.
कुत्र्याचा मालक आणि त्याचे घर जवळपास कुठेतरी खात्रीनेच असले पाहिजे, असे त्याच्या मनात आले.
तिथे आपल्या सोबत्यांसाठी खाण्यापिण्याचे हमखास मिळेल, असे त्याला वाटले.
मग तो कुत्र्याच्या दिशेने निघाला.
त्याला घनदाट जंगल लागले.
त्याने मोठ्या धीराने ते जंगल पार केले.
पाहतो तो एका झाडाखाली त्याला एक म्हातारा दिसला.
पाण्याचा तलाव त्याच्या जवळच होता.
त्याला खूप आनंद झाला.

म्हाताऱ्याची जणु समाधी लागली होती.
थंडगार पाणी प्यायला मिळणार, या आनंदात तो होता.
त्याने कसला विचार केला नाही,
कसली शंका त्याच्या मनाला चाटून गेली नाही.
तडक तो तलावाजवळ गेला.
त्याने कमळाचे एक पान तोडले.
त्याचा द्रोण केला.
त्याने पाण्याचा घोट घेतला असेल नसेल इतक्यात त्याच्या कानावर कोणाचा तरी रागीट आवाज आला.
"तू माझा आता कैदी आहेस! तिथेच थांब!"
त्या आवाजासरशी तो प्रवासी घाबरला. त्याने मागे वळून पाहिले. तो तिथे तो म्हातारा उभा!
त्याला एकदम आठवण झाली.
त्याच्या हातात एक मंतरलेला गंडा होता.
असा गंडा असणाऱ्याच्या जिवाला कोणी दगा करू शकत नाही.
त्याच्यापुढे त्याची डाळ शिजत नाही.
त्यामुळे त्या यक्षिणीचे त्याच्यापुढे काही चालले नाही.
त्याचा नाश तिला करता आला नाही.

तिने त्याला पकडले आणि एका तळघरात त्याची रवानगी केली!

आपला गेलेला सोबती परत आला नाही हे पाहून विजयचे इतर मित्र काळजीत पडले.

त्यांनी त्याचा शोध घ्यायचे ठरवले.

एकेक जण शोधाला निघाला.

प्रत्येक जण त्या तलावापाशी पोचायचा.

आणि पहिल्यासारखीच प्रत्येकाची गत व्हायची.

शेवटी एकटा विजयच तेवढा मागे राहिला.

मग तोही सोबत्यांच्या शोधात निघाला.

तलावाच्या दिशेने जाणाऱ्या खूप पाऊलखुणा विजयला दिसल्या.

परतणाऱ्या पावलांची मात्र एकही खूण त्याच्या नजरेला पडली नाही.

त्याला त्या म्हाताऱ्याचा संशय आला.

ह्या म्हाताऱ्यानेच आपल्या माणसांचा घात केला असला पाहिजे, असे त्याच्या मनात आले.

पण तसे काही त्याने दाखवले नाही.

तो सरळ जाऊन त्या म्हाताऱ्यापुढे उभा राहिला.

म्हणाला : "माझे सोबती इकडून गेलेले तुम्हाला दिसले का? खाणेपिणे शोधायला ते निघाले होते."

तो म्हातारा म्हणाला : "उगीच तुझ्या सोबत्यांची काळजी करू नकोस. घोटभर तळ्यातले पाणी पिऊन ताजातवाना हो. मग करू त्यांची वास्तपुस्त."

म्हाताऱ्याच्या ह्या उत्तराचा विजयला भारी राग आला. त्याने त्या म्हाताऱ्याचे दोन्ही खांदे घट्ट धरले आणि तलवारीला हात घातला !

म्हाताऱ्यावर ओरडून तो म्हणाला : " मी राजकुमार विजय आहे. तुझ्यासारख्या छप्पन्न लोकांना पाणी पाजण्याची ताकत माझ्या मनगटात आहे. जर बऱ्या बोलाने माझ्या माणसांची तू सुटका केली नाहीस तर इथल्या इथे तुझा मुडदा पाडल्याशिवाय राहाणार नाही."

म्हातारा विजयच्या या शब्दांनी घाबरला.

त्याच्या पाया पडू लागला.

आर्जवे करू लागला.

" महाराज, माझ्यावर दया करा. मला मारू नका. जीवदान द्या. मला जीवदान दिलेत तर मी तुमच्या सगळ्या माणसांना सोडून देईन. एवढेच नव्हे तर या बेटाचा तुम्हाला राजा करीन. दया करा महाराज. "

विजयने त्याला सोडून दिले.

म्हाताऱ्याने आपला शब्द पाळला.

विजयच्या सोबत्यांची सुटका झाली.

त्यांच्या जेवणाखाणाची सोय लागली.

विजयचे सोबती पानांवर बसले.

विजयने त्या म्हाताऱ्याचे पान आधी वाढले.

त्याला आधी भात खाऊ घातला.

मग सगळेजण एकचित्ताने जेवले.
सर्वांनी जेवणावर चांगलाच हात मारला.
विजयची चातुरी आणि त्याची शक्ती यावर कुवेणीचे मन जडले.
त्याचा देखणेपणा आणि त्याचे शौर्य यांच्यावर कुवेणी भाळली.
तिला विजयबद्दल प्रेम वाटू लागले.
मग तिने आपले म्हाताऱ्याचे सोंग टाकून दिले आणि आपल्या खऱ्या रूपाने ती तिथे प्रकट झाली.

ती विजयला म्हणाली : " या यक्षांना खडे चारून तू या बेटाचा राजा हो. "
विजयने त्या बेटावरच्या यक्षांचा पराभव केला.
मग बेटाचा तो राजा झाला.
कुवेणीने विजयशी लग्न केले.
विजय मग चांगला वागू लागला.
आपल्या सोबत्यांनाही मग त्याने चांगले वागण्याबद्दल ताकीद दिली.
त्या सगळ्यांना त्याने कामाला लावले.
बेटावर त्यांनी सुंदर सुंदर शहरे वसवली.
दिवसामागून दिवस गेले.
विजयच्या सोबत्यांचा आनंद कमी होऊ लागला.
घरची सय त्यांना येऊ लागली.

आपलाही संसार थाटावा, असे त्यांना वाटू लागले.
देशाकडे त्यांचे मन ओढ घेऊ लागले.
आपण लग्ने करून संसार थाटले नाहीत तर आपला वंश खुंटेल, अशी त्यांना भीती वाटू लागली.
मग त्यांनी विजयच्या पाठीशी धोशा लावला.
" कुवेणीला पाठवून आमच्यासाठी तू नवऱ्या मुली शोधून आण." असे ते म्हणू लागले.
"वंगात जाऊन नवऱ्या मुली आणा." असा त्यांचा आग्रह होता.
पुढे कुवेणीने त्यांच्यासाठी नवऱ्या आणल्या.
त्यांचे संसार सुरू झाले.
सिंहबाहूचे वंशज म्हणून सिलोनमधील लोकांना सिंहली नाव पडले असे लोक म्हणतात.
सिंहबाहू म्हणजे सिंहाची हिंमत आणि ताकत असणारा पुरुष.
विजय सिंहबाहूचा मुलगा होता आणि त्याचा तो सगळा परिवार त्यामुळेच सिंहली ठरला.

■ ■

पाकिस्तानी कथा

# कावळ्याची फजिती



सकाळची वेळ होती. एक कावळा इकडे तिकडे हिंडत फिरत खायला काही मिळते का शोधीत होता, एखादे मेलेले :जनावर कुठे दिसते का पाहत होता. इतक्यात त्याच्या नजरेला पडला एक चिमणा ! छान गुबगुबीत होता. चिमणा अतिशय आनंदात दाणे टिपीत होता. जगाची जणु त्याला काही दाद-फिर्याद नव्हती. कावळ्याची नजर त्या चिमण्यावर पडली आणि त्याच्या तोंडाला

पाणी सुटले. त्याच्या मनात विचार आला, हा गुबगुबीत चिमणा जर आपल्याला मटकवायला मिळाला तर काय बहार होईल !

मग तो त्या चिमण्याकडे गेला. म्हणाला : " रामराम चिमणेबुवा. बरं आहे ना ? "
" रामराम कावळेदादा. बरे आहे. " चिमणा खुषीत म्हणाला.
" चिमणेबुवा, तुम्हाला ह्या जगातला न्याय माहीत आहे ना ? " कावळ्याने विचारले.
" काय बुवा, काय काम आहे ? " चिमण्याने प्रश्न केला.
" या जगात सत्ता चालते ती बलवंतांची, चतुर, शहाणे यांची. दुबळे, मूर्ख आणि अज्ञानी यांचे कोणी वाली नसते. " तो दुष्टाव्याने बोलला.
चिमणा बिचारा भोळा. तो म्हणाला : " कावळेदादा, तुम्ही सांगता ते खरेच आहे. "
मग कावळ्याने आणखी बोलणे काढले. बलवान व्हायचे तर खूप खाल्ले पाहिजे. जो खूप खात असेल तो बलवान ठरणार, असे काहीबाही त्याने चिमण्याला सांगितले. मग म्हणाला : " आपण लावू या पैज खाण्याची ! "
चिमण्याला कावळ्याच्या बोलण्याची भुरळ पडली होती आणि त्यामुळे तो कावळ्याच्या म्हणण्याला माना डोलवीत होता. कावळा म्हणाला : " पैज अशी की जो लवकर

खाऊन वस्तु फस्त करील तो जिंकेल आणि मग त्याने हरेल त्याला खाऊन टाकावे!"

चिमण्याला कावळ्याचा कावा काही कळला नाही. बिचारा 'हो' म्हणून बसला.

मग दोघांनी दोन सारखी मापे आणली. ती भरून खाण्याच्या वस्तु आणायच्या. एकदम खायला सुरुवात करायची. आणि कोण जिकतो ते पहायचे, असे ठरले.

एक भांडे काठापर्यंत गवताच्या दाण्यांनी भरले आणि दुसरे लाल मिरच्यांच्या बियांनी.

ठरलेली खूण झाल्यावर दोघांनी खायला सुरुवात केली. कावळ्याने गपागपा खाऊन संपवले.

चिमण्याला चांगले वळण लावलेले होते. त्यामुळे तो दर घासानंतर आपली चोच नीट वासून पुसून साफ करी आणि नंतर दुसरा घास घेई.

तो पडला मागे.

कावळ्याचे खाऊन संपल्यावरोबर त्याने नाचायला सुरुवात केली. "मी जिंकलो, चिमणा हरला!" असे तो ओरडू लागला.

चिमणा हिरमुसला झाला. पण तो सभ्य होता, आपल्या शब्दाला जागणारा होता. तो म्हणाला : "कावळेदादा, आपली पैज ठरली आणि त्यात तुम्ही जिंकलात, ही गोष्ट खरी आहे. ठरल्याप्रमाणे तुम्ही आता मला खाऊ शकता,

माझे वाटेल ते करू शकता. पण माझी अखेरची एक विनंती तुम्हाला आहे तेवढी मान्य करा. मग मी तयार आहे."

कावळा पैज जिंकल्याने सुखावला होता. तो आनंदाने म्हणाला : "हात्तीच्या. एवढेच ना? सांग काय तुझी विनंती आहे ते."

चिमणा म्हणाला : "हे पहा आपल्या चोचीने खुशाल वाटेल त्या जिनसा तू खातोस. तुला काय खावे, काय खाऊ नये याचा धरबंध नाही. तेव्हा एक मेहरबानी माझ्यावर कर. मला खायच्या आधी कृपा करून तुझी ती चोच तेवढी स्वच्छ करून ये आणि मग मला खुशाल खा."

कावळ्याला वाटले, यात वावगे काहीच नाही. चिमणा म्हणतो ते खरेच आहे. आपले यात काही बिघडणार नाही. त्याने आपली चोच अशा रीतीने कधी स्वच्छ केलीच नव्हती. तो म्हणाला : "तू इथे थांब. मी आता येतो चोच धुवून."

चिमणा तिथेच थांबला. कावळा उडाला नदीच्या रोखाने. नदीला म्हणाला : "नदीमाई, नदीमाई, चोच धुवायला मला थोडे पाणी घेऊ देशील का? चोच धुईन. चिमण्याला खाईन. ढेकर देईन."

नदी म्हणाली : "हजारो लोक माझे पाणी वापरतात. तुलाही घ्यायला माझी ना नाही. पण आपल्या चोचीने

तू वाटेल त्या जिनसा खुशाल खातोस. तेव्हा माझ्या पाण्यात मी तुला चोच बुडवू देणार नाही! तू एक गाडगे कुंभाराकडून आण. पाणी भरून घे. बाहेर जाऊन खुशाल चोच धूत बस. माझी काही हरकत नाही."

कावळा गेला तडक कुंभाराकडे. त्याला म्हणाला : " कुंभारदादा, कुंभारदादा, मला एक गाडगे दे. गाडगे घेईन. नदीवर जाईन. पाणी भरीन, चोच धुईन. चिमण्याला खाईन. ढेकर देईन."
कुंभार म्हणाला : " कावळेबुवा, तुम्हाला एखादे गाडगे मी दिले असते हो, पण माझ्या जवळ मातीचे डिखूळ देखील नाही. तुम्ही माती तेवढी आणून द्या म्हणजे लगेच एक झकास गाडगे तुम्हाला बनवून देईन."

मग कावळा गेला जमिनीकडे. म्हणाला : " काळी आई, काळी आई! मला मातीचे एक डिखूळ दे. डिखूळ कुंभाराला देईन. एक गाडगे घेईन. नदीवर जाईन. पाणी घेईन. चोच धुईन. चिमण्याला खाईन. ढेकर देईन."
पण महिना चैत्राचा होता. दिवस उन्हाळ्याचे होते. सगळी जमीन तापून एखाद्या दगडासारखी घट्ट झाली होती. डिखूळ कसे निघणार ?
जमीन म्हणाली : " कावळोबा, कावळोबा, एकच काय, खूप डिखळे तुला देईन. पण अंग झाले आहे टणक. तू

एक शिंग घेऊन ये. म्हणजे तुला डिखूळ उकरून घेता येईल."

मग कावळा गेला म्हशीकडे. "म्हैस बाई, म्हैस बाई. तुझे शिंग मला देशील का? शिंग घेईन. माती उकरीन. कुंभाराला देईन. गाडगे आणीन. पाणी काढीन. चोच धुईन. चिमण्याला खाईन. ढेकर देईन!"

म्हैस तसा नेहमी शांत असणारा प्राणी. पण उन्हाळ्याने ती त्रासली होती, कावली होती. कावळ्यावर ती रागावली. म्हणाली: "मोठा शहाणाच दिसतोस की शिंगे मागायला! असे कोणी शिंगे देते काय! निघ इथून. कर काळे!"

कावळ्याला आला म्हशीचा राग. तो मनात म्हणाला: "शिंग मागितले तर एवढे रागवायला काय झाले? फार शेफारली आहे म्हैस! तिची चांगली खोडकी जिरवली पाहिजे."

तो गेला मग कुत्र्याकडे. म्हणाला: "कुत्रे दादा, कुत्रे दादा. माझे एक काम करा. ती म्हैस फार माजली आहे. तू चावून चावून तिला मारून टाक म्हणजे मला तिची शिंगे घेता येतील. मग डिखूळ उकरीन. कुंभाराला देईन. गाडगे घेईन. पाणी काढीन. चोच धुईन. चिमण्याला खाईन ढेकर देईन!"

कुत्रा म्हणाला: "हात्तीच्या एवढेचना. म्हशीला मारणे म्हणजे काहीच नाही. पण उन्हाळ्यामुळे माझे चालले आहेत हाल! तू जर एक घुटकीभर ताजे गाईचे दूध

आणून देशील तर मग लगेच तुझे काम मी करीन."

मग कावळा गेला गायीकडे. म्हणाला : "गायी गायी, मला थोडे दूध देशील का? दूध घेईन, कुत्र्याला देईन. कुत्रा म्हशीला मारील. तिचे शिंग मला मिळेल. त्याने माती उकरीन, कुंभाराला देईन. गाडगे घेईन, नदीचे पाणी आणीन. चोच धुईन, चिमण्याला खाईन. आणि मग ढेकर देईन."

गाय म्हणाली : "थोडेच काय पण वाटेल तितके दूध मी तुला देईन. पण माझी चालली आहे उपासमार. तू जर मला थोडा हिरवा चारा आणून देशील तर मी तुला दूध देईन. इथली सगळी हिरवळ पहा कशी सुकून गेली आहे. कुरणात जाऊन थोडा चारा आण म्हणजे तुझे काम झालेच समज."

मग कावळा गेला कुरणाकडे. "कुरणा, कुरणा. मला थोडे गवत देतोस का? गवत गाईला देईन, तिचे दूध घेईन. दूध कुत्र्याला पाजीन, कुत्रा म्हशीला मारील. म्हशीचे शिंग मिळेल, त्याने डिखूळ काढीन. कुंभाराला देईन, गाडगे घेईन. नदीवर जाईन, पाणी काढीन, चोच धुईन. नंतर चिमण्याला खाईन आणि ढेकर देईन!"

कुरण म्हणाले : "चाराच हवा ना. केव्हाही देईन. पण गवत कापायला विळा बिळा आहे का तुझ्याजवळ?"

कावळा म्हणाला, "विळा बिळा माझ्याजवळ काही नाही बुवा."

कुरण म्हणाले: “ लोहाराकडे जाऊन घेऊन ये. ”

मग कावळा गेला लोहाराकडे. “ लोहारदादा, लोहारदादा, मला एक विळा देतोस का? विळा घेईन, गवत कापीन. गायीला देईन, दूध घेईन. कुत्र्याला पाजीन, कुत्रा म्हशीला मारील. मला शिंग मिळेल. मग माती उकरीन, कुंभाराला देईन. गाडगे घेईन, नदीवर जाईन. पाणी आणीन, चोच धुईन.चिमण्याला खाईन,ढेकर देईन.”

लोहार म्हणाला : “ एकच विळा हवाय ना. आता देतो करून. पण माझी भट्टी विझली आहे. एवढासा निखारा घेऊन ये कुठून तरी. झटपट विळा तयार करून देईन तुला.”

मग कावळा गेला शेजारच्या घरात. बाईंना भेटला. “ बाई बाई, मला एक निखारा द्या ना. निखारा घेईन, लोहाराला देईन. विळा घेईन, गवत कापीन. गायीला देईन, दूध कुत्र्याला पाजीन. कुत्रा म्हशीला मारील, मला शिंग मिळेल. शिंग घेईन, डिखूळ काढीन, कुंभाराला देईन. गाडगे घेईन, नदीवर जाईन. पाणी आणीन, चोच धुईन. चिमण्याला मटकावीन आणि ढेकर देईन.”

बाई म्हणाल्या: “ एकच काय वाटेल तेवढे निखारे घेऊन जा. पण नेशील कसे ? ”

कावळ्याला झाली होती घाई. केव्हा एकदा आपण चिमण्याला मटकावतो असे त्याला झाले होते. म्हणाला: “ त्यात काय आहे, चोचीत जाईन घेऊन ! ”

बाईंनी फुंकर घालून निखारा फुलवला. चिमट्याने चुलीतून काढला आणि कावळ्यापुढे ठेवला. कावळ्याला धीर नव्हता. त्याने विचार न करताच तो निखारा चोचीत धरला. त्याची चोच, जीभ भाजली आणि त्यामुळे कावळा मरून गेला !

बिचारा चिमणा दिवसभर त्याच जागी बसून कावळ्याची वाट पहात होता ! पण एवढ्यात तिकडून येणाऱ्या शेतकऱ्यांनी कावळा जीभ भाजून मेला त्याची हकिगत सांगितली. चिमणा आनंदला आणि घरी परतला. आपल्या पिल्लांना त्याने मग सगळी हकिगत सांगितली आणि मग ते सगळे सुखाने राहिले.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ५८९८२५ दि. ...
क्रमांक ३६८८ नोंद दि. २५।३।८७

IRBK-0114044



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का वा
क्र. क्र. २३५४

२३६९

# अरुणा

IRBK-0102385

१. का. २५५७२

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
वा. नं.





अच्युतराव

रावसाहेब



-7 JUL 1975
दा.क्र.-२३८५




मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
१०२४८

लेखक व संपादक
गजानन काशीनाथ रायकर

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
दा. क्र. २३८५ ओं नि ..........
वि. का.वा. .. क्र. ...................
IRBK-0102385

एक
जय हिं... प्रकाशन
झावबावाडी : मुंबई २
जयहिन्द प्रकाशन

मूल्य चार आणे

* ८ *

प्रथमावृत्ति
१९४६
सर्वाधिकार सुरक्षित

मुद्रक
र. रा. बखले
मुंबई वैभव
प्रेस : मुंबई ४

प्रकाशक
अ. गं. पवार
गंगासागर प्रेस
जालना

★ ★ ★

ब्लॉक्स्
बॉम्बे प्रोसेस
स्टुडियो
मुंबई १

चित्रकार
रघुवीर
मुळगांवकर
मुंबई ४

मुखपृष्ठ छपाई
हिंद प्रिंटिंग वर्क्स्
कांदेवाडी
मुंबई ४

★

# अनुक्रमणिका

★

## भाई अच्युतराव पटवर्धन

१ जय हिन्द ... ... ५
२ पटवर्धन घराणें ... ६
३ बाळपण व शिक्षण ... ८
४ बंडखोर पुढारी ... ९
५ अपूर्व सत्कार ... ११
६ गुणगौरव ... ... १३
७ पोवाडा ... ... १५

## अरुणा असफअली

१ स्वातंत्र्याचा अरुणोदय ... २२
२ लढ्याचा श्रीगणेशा ... २४
३ विवाहयोग ... ... २५
४ तुरुंगाची यात्रा ... २६
५ लढ्याची तयारी ... २८
६ भूमिगत चळवळ ... ३०
७ व्यक्तिदर्शन ... ... ३१

★

कॉंग्रेस समाजवादी पक्षाचे मुख्य पुढारी



— भाई जयप्रकाश नारायण यांस —

# कृतज्ञता !

हिंदमातेचीं दोन मुलें। अच्युत आणि अरुणा ।। या दोघांनीं १९४२ च्या क्रांतींत भूमिगत राहून हिंदमातेच्या शृंखला तोडून टाकण्यासाठीं प्रचंड चळवळ केली। यशस्वी झाली!। आणि आज आपली हिंदमाता या आपल्या लाडक्या मुलांकडेच आशेनें पहात आहे!!। हीं मुलें आपल्या मातेला लवकरच स्वातंत्र्य देतील!

या दोघांचीं चरित्रें आजच्या तरुण पिढीला आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शक असल्यामुळें थोडक्यांत दिलीं आहेत. या कामीं आमचे नगरचे अधिकृत विक्रेते श्री. बापट, नगरचे श्री. तात्यासाहेब आपटे, श्री. द. बा. डावरे, श्री. बाबुराव भावे, श्री. रत्नपारखी, श्री. देशपांडे, देशमुख बंधु, श्री. गं. स. डांगे, मुंबईचे श्री. रा. भि. जोशी, सौ. सुधा जोशी व नवयूगचा खास अंक यांचें फार सहाय्य झालें. मी या सर्वांचा फार ऋणी आहें. सुप्रसिद्ध शाहीर खाडिलकर यांनीं अगदीं थोड्या वेळांत फार सुंदर पोवाडा करून दिला. धन्यवाद! आदर्श चित्रकार, मुळगांवकर यांच्या सजावटीनेंच माझें प्रकाशन सर्वांच्या आवडीचें झालें आहे! शतशः प्रणाम!। बॉंबे प्रोसेस स्टुडियोचे मालक श्री. कामत व मुंबई वैभव प्रेसमधील कामगार मित्र यांच्या तत्पर सहकार्याची मला कायमची आठवण राहील। आमचे पत्रकार मित्र फारच खूष आहेत आमच्यावर। किति आभार मानूं? मित्रांनों। फार लोभ आहे तुमचा माझ्यावर! माझें प्रत्येक पुस्तक आपणाला आवडतें हें वाचून फार आनंद होतो मला!! अशींच सुंदर सुंदर पुस्तकें देईन बरें तुम्हाला!!।

—ग. का. रायकर

# बेचाळिसी बंडाचे नेताजी

# भाई अच्युतराव पटवर्धन

जय हिन्द!

१

हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या इतिहासांत बेचाळीस ऑगस्टची क्रांति अद्वितीय ठरल्यावांचून रहाणार नाहीं! अठराशें सत्तावन्न सालीं हिंदी जनतेनें परकीय साम्राज्यशाहीशीं पहिलें स्वातंत्र्य-युद्ध पुकारलें खरें. तथापि, त्या युद्धाची आघाडी एकच होती. आणि त्या आघाडीचें स्वरूपही अगदीं एकेरी होतें. वीस सालापासून महात्मा गांधीजींनीं परकीय सत्तेशीं जो शांततामय संग्राम सुरू केला त्याच्या आघाड्या दोन होत्या. एक कायदेभंगाची आणि दुसरी असहकाराची. तथापि, त्यांचें पर्यवसान कारागृहवासामध्यें जाण्यांतच होत असल्यानें त्या युद्धाचें स्वरूप त्या दृष्टीनें एकेरी होतें. पण बेचाळीस ऑगस्टमध्यें महात्माजींनीं 'भारत सोडा' अशी गर्जना करून ब्रिटिश राजसत्तेशीं जें निकराचें स्वातंत्र्ययुद्ध पुकारलें त्याच्या एकदम तीन आघाड्या उघडल्या गेल्या. कारण जनतेच्या स्वातंत्र्ययुद्धाचें तंत्र आतां अधिक परिणत झालेलें होतें. खुद्द महात्माजी आणि कॉंग्रेसचे धुरंधर पुढारी यांनीं अहिंसात्मक प्रतिकाराची एक प्रकट आघाडी देशामध्यें उघडली तर, त्याच बरोबर अच्युत पटवर्धन आणि अरुणा असफअली यांनीं भूमिगत प्रतिकाराच्या दुसऱ्या देशव्यापक

आघाडीवर साम्राज्यशाहीबरोबर झुंज खेळावयाला सुरुवात केली. आणि नेताजी सुभाषचंद्र बोस यांनीं देशाबाहेर तिकडे 'आझाद हिंद फौज' उभारली आणि इंग्रज सत्तेचा कोट बाहेरून फोडण्याकरितां या युद्धाची तिसरी आघाडी उघडली ! अशा रीतीनें बेचाळीस ऑगस्टचे बहाद्दूर स्वातंत्र्यवीर तीन आघाड्यांवर इंग्रजांशीं लढत होते ! इंग्रजांच्या कंठाशीं अगदीं प्राण येऊन पोहोंचले होते. आणि अणुगोलाच्या आसुरी शस्त्रामुळें जपान जर इतक्या झपाट्यानें शरण आलें नसतें तर, बेचाळिसी क्रांतीच्या या तीन्हीही आघाड्यांवर हिंदी जनतेनें ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं लढून तिचा निश्चयानें पराभव केला असता ! महात्मा गांधी, नेताजी सुभाष आणि अच्युतराव पटवर्धन हे बेचाळिसी स्वातंत्र्ययुद्धाचे तीन सेनापति होत ! म्हणूनच स्वातंत्र्याची ही त्रैमूर्ति आज जनतेच्या देवघरामध्यें जाऊन बसलेली आहे !

## पटवर्धन घराणें

२

रत्नागिरी जिल्ह्यामध्यें राजापूर तालुक्यांत जानसी नांवाचें एक खेडें आहे. पटवर्धन घराणें हें मूळचें या खेड्यांतलें ! अच्युतरावांचे आजोबा केशवराव हे विद्याभ्यासाकरितां पुण्याला आले आणि पदवीधर झाले. कांहीं दिवस मुख्याध्यापकाचें काम व ठाण्याला डेप्युटीची नोकरी करून शेवटीं ते नगरला आले व तेथें वकिली सुरू केली. वकिलीमध्यें

त्यांनीं हां हां म्हणतां चांगलाच नांवलौकिक मिळविला व पैसाही भरपूर सांठविला. केशवराव १९१८ सालीं दिवंगत झाले !

केशवरावांचे चिरंजीव हरिभाऊ यांनीं आपल्या वडिलांच्या नांवलौकिकांत उत्तम भर घातली. ते एक निष्ठावान् थिऑसॉफिस्ट होते. सेवावृत्ति हा त्यांच्या आयुष्याचा बाणा होता. ' नगर पोस्टल युनियन'चे ते पहिले अध्यक्ष झाले होते.



पुरुषोत्तम, अच्युत, जनार्दन, वासुदेव, पद्माकर, मधुकर आणि कु. विजया अशीं एकंदर हरिभाऊंना सात अपत्यें ! हीं सर्व मुलें सुशिक्षित असून आपापल्या व्यवसायांत हुशार व उद्योगी आहेत. रावसाहेब आणि अच्युतराव हे तर तरुणांच्या गळ्यांतील-ताईतच आहेत ! जनार्दनपंत पद्वीधर असून स्वतंत्र धंदा करतात. वासुदेराव कराचीला मिठाच्या कारखान्यांत मोठ्या हुद्यावर आहेत. पद्माकर हे मुंबईला इंजिनिअर आहेत. मधुकरराव हे सेवादलाची संघटणा वगैरे सार्वजनिक कार्य करीत असतात. कु. विजया सर परशुरामभाऊ कॉलेजांत इंटरमध्यें आहे. हीं सर्व मुलें आपल्या आईला—वहिनी म्हणतात. वहिनीसाहेब अत्यंत प्रेमळ असून धार्मिक प्रवृत्तीच्या आणि तितक्याच उदारमतवादीही आहेत.

मुलांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्यावर कोणतीच गोष्ट त्या लादीत नाहींत. रावसाहेबांच्या पत्नी सौ. माणिकबाई या सुविद्य असून साक्षरता-प्रसाराचें काम आवडीनें करतात. हरिभाऊ ३१ जानेवारी १९२४ रोजीं न्युमोनियानें स्वर्गवासी झाले. अच्युतच्या चुलत्याजवळ खूप संपत्ति होती; पण त्यांना मूलबाळ नव्हतें. या चुणचुणीत आणि हुशार छोकऱ्याला दत्तक घेण्याचा त्यांनीं विचार केला. या दत्तकप्रकरणामुळेंच अच्युतला, 'अच्युत सीताराम पटवर्धन' अशी सही करावी लागते.

## बाळपण व शिक्षण

३

१९०५ सालीं नगराला प्लेग सुरू झाल्यामुळें सर्व पटवर्धन मंडळी गांवाबाहेरच्या आपल्या मळ्यामध्यें रहावयाला गेली. आणि त्या मळ्यांतील मोकळ्या, स्वच्छ व स्वतंत्र वातावरणांत ५ फेब्रुवारीला अच्युत जन्मला! लहानपणीं फार नाजुक प्रकृतीचा मुलगा होता हा! मैदानी खेळांची त्याला आवड मुळींच नसे. तैलबुद्धीचा विद्यार्थी म्हणून त्याची वर्गांत ख्याति होती.

१९२१ सालीं नगरच्या शाळेंतून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठीं बनारसला गेले आणि बेझंट बाईच्या सेंट्रल हिंदु कॉलेजमध्यें त्यांनीं आपलें नांव दाखल केलें. या कॉलेजांत तेलंग व अरुंडेल यांसारखा बुद्धिमान् प्राध्यापकवर्ग

होता; व त्यांच्या प्रभावाखालीं त्यांचें शिक्षण झालें, आणि या थोर गुरूंचे ते लाडके शिष्य बनले !

या कॉलेजांतून एम्. ए. ची परीक्षा पास होतांच ते युरोपला गेले आणि परत आल्यानंतर बनारसलाच अर्थशास्त्राचे प्राध्यापक झाले.

## बंडखोर पुढारी

४

१९३० ची कायदेभंगाची चळवळ सुरू झाली होती. अच्युतरावांनीं आपल्या नोकरीचा राजीनामा देऊन ते मुंबईच्या कार्यकर्त्यांच्या गोटांत सामील झाले. याच वेळेपासून त्यांच्या खऱ्या आयुष्याला सुरवात झाली. त्यांनीं मुंबईतील संघटणा इतकी कौशल्यपूर्ण केली कीं, ही व्यक्ति तरी कोण आहे याचा थांगपत्ता सरकारलाच काय पण खुद्द कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना देखील लागला नाहीं ! बुलेटिन काढून आपल्या तत्त्वाचा प्रचार करणें हें काम त्यांनीं अव्याहत चालू ठेवलें होतें !

१९३४ सालीं मुंबई कॉंग्रेसच्या वेळीं प्रथम त्यांनीं आपल्या प्रभावी वक्तृत्वानें कॉंग्रेस-श्रेष्ठींचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें. त्यावेळीं त्यांची वर्किंग कमिटीमध्यें निवड झाली. हरिपुरा कॉंग्रेस-पर्यंत ते वर्किंगकमिटीचे सभासद राहिले, आणि तदनंतर आपणहून त्यांनीं तें पद नाकारलें.

गांधींच्या वैयक्तिक सत्याग्रहांत, अच्युतरावांची नाशिकच्या तुरुंगांत रवानगी झाली. भाई जयप्रकाश नारायण, मसानी, अशोक

मेहता वगैरे मंडळी त्याच तुरुंगांत होती. याच पुढाऱ्यांनीं तुरुंगांतून बाहेर आल्यावर समाजवादी पक्ष स्थापन केला.

९ ऑगस्ट १९४२ ला 'हिंद छोडो' चें बंड सुरू झालें. अच्युतरावांनीं या बंडांत बेदरकारपणें उडी घेतली. महात्माजींनीं दिलेला 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र खऱ्या अर्थानें त्यांनीं आचरणांत आणला. सतत साडेतीन वर्षें अज्ञातवासांत राहून साम्राज्यशाही सरकारला त्यांनीं खडे चारले. त्यांना पकडण्यासाठीं सरकारनें आपल्या जिवाचें रान केलें. सारी पृथ्वी पालथी घातली आणि आकाशपाताळ एक केलें. या ४४ महिन्यांत एक दिवस अच्युतराव कधीं एका ठिकाणीं थांबले नाहींत. ते एकसारखे धांवत होते, पळत होते. पळतां पळतां लढत होते. आणि स्वातंत्र्याच्या शत्रूशीं झगडत होते. एक दिवस त्यांना कधीं सुखानें घांस खायला मिळाला असेल कीं आरामानें झोंप घेतां आली असेल ! रात्रीच्या रात्री त्यांच्या डोळ्याला डोळा लागला नसेल, कीं पाठ जमिनीला टेकली नसेल ! आज मुंबई तर उद्यां सातारा, तर परवां दिल्ली अन् तेरवां कलकत्ता ! एकाद्या झंझावाताच्या झोताप्रमाणें उभ्या देशामधून हा क्रांतिवीर तळहातावर शीर घेऊन सोसाटत होता ! तो सर्वांना भासत होता पण कोणालाही दिसत नव्हता !

'स्वतंत्र व्हा' हा गांधीजींचा आदेश त्यांनीं खऱ्या अर्थानें अंमलांत आणला. जीवित-वित्ताची पर्वा केली नाहीं. या अभूतपूर्व क्रांतिकारक प्रसंगीं भारतांतील क्रांतिवीर जनतेचें त्यांनीं उत्कृष्ट मार्गदर्शन केलें आणि साम्राज्यशाहीशीं हिरीरीनें लढा दिला.

⚜ ⚜ ⚜

## अपूर्व सत्कार

५


३ एप्रिल १९४६ ला मुंबई इलाख्यांतलें दडपशाहीचें राज्य संपलें आणि कॉंग्रेसचें राज्य सुरू झालें. घरोघर तिरंगी झेंडे फडकूं लागले, आणि स्वातंत्र्याचे चौघडे वाजूं लागले. स्वातंत्र्यासाठीं स्वखुषीनें वनवास पत्करलेल्या क्रांतिकारक वीरांना अभय मिळालें. त्यामुळें हा बेचाळिसी बंडाचा बहाद्दूर सेनापति आपल्या भूमिगत गुहेंमधून सात एप्रिल रोजीं गुरगुरत बाहेर आला आणि मुंबईच्या लक्षावधि स्वातंत्र्यप्रेमी जनतेसमोर प्रकट झाला! दाही दिशांमधून एकच गगनभेदी आरोळी उठली! "अच्युत पटवर्धन झिंदाबाद!"

आपलें हें भव्य आणि छानदार स्वागत पाहून त्यांना क्षणभर काय बोलावें तेंच सुचेनासें झालें. ते म्हणाले,

"प्रत्येक गांव–कॉंग्रेसकमिटीनें जनतेला स्वराज्याचें शिक्षण दिलें पाहिजे व गांवागांवात स्वराज्य स्थापन झालें पाहिजे. मग इंग्रज सरकारच काय, पण अणुस्फोटकहि आम्हांला गुलामींत ठेवूं शकणार नाहीं! वाटाघाटी करावयास येणाऱ्यांना सांगायला हवें कीं—आम्हीं स्वतंत्र आहोंत हें कबूल असेल तर या, बोला! नाहींतर चालू लागा! स्वराज्य दिल्लींत नाहीं; तें गांवोगांवीं आहे!"

मुंबईच्या स्वागतानंतर ते आपल्या मातृभूमीला-अहमदनगरला–गेले. साडेतीन वर्षांच्या अज्ञातवासानंतर आईनें आपल्या मुलाचें

स्वागत करावें तसें त्या मायभूमीनें अच्युतरावांचें स्वागत केलें. रस्त्यारस्त्यावर झालेलें सडासंमार्जन, वैभवानें फडकणारे राष्ट्रीय



ध्वज, आनंदानें डोलणाऱ्या गुढ्या, कौतुकानें नाचणारीं तोरणें

आणि पताका आणि भावनांनीं बेहोष झालेलीं आसपासचीं असंख्य नयन-युगुलें पाहून, अच्युतरावांचा गळा गदगदून आला ! अयोध्येस परत आलेल्या रामाची आठवण झाली त्यावेळीं !

रात्रीं सभेच्या वेळीं क्रांति-भीष्म सेनापति बापट यांनीं अच्युतरावांना आशीर्वाद दिला व सन्यासी त्यागवीर स्वामी सहजानंद भारती म्हणाले,

"अशा वीर नररत्नाला ज्या मातेनें जन्म दिला ती धन्य होय !" आणि याच वेळेपासून या अहमदनगराला **अच्युतनगर** म्हणण्याचें सर्वांनीं ठरविलें ! व हेंच नांव आतां प्रचारांत आलें आहे !

## गुणगौरव

ह अच्युतराव म्हणजे एक लाख मोलाचें रत्न आहे ! मनांतील प्रत्येक विचार, आपल्या हावभावांत, पोषाखांत, उच्चारांत आणि आचारांत उतरलाच पाहिजे असा त्यांचा अट्टाहास असतो. त्यांची 'अधीर वृत्ति' हा सर्वांत मोठा विशेष त्यांच्या आजवरच्या पोषाखांत पूर्णपणें व्यक्त होतो. चढाव, आणि सुरवार यांनीं नटलेले अच्युतराव आपण पाहिले होतेत ! तलम खादीचें धोतर, कडक इस्त्रीचा नेहरू शर्ट व तिरकी टोपी चढवून "कॉंग्रेसला मतें द्या !" असा प्रचार करीत हिंडणारे अच्युतराव आपण विसरलां नसाल ! आणि आतां सैलसर खादीचा कुडता, पायघोळ धोतर, आणि लहानशा पायांना जरा विशोभितच दिसणाऱ्या काळ्या पठाणी वाहाणा असा पेहराव केलेली नाजुक आणि तोकड्या व किंचित् रुपेरी केसाची ही मूर्ति आपण रोज पहातों !!

१९०५ सालीं अच्युतरावांचा जन्म अहमदनगरांत झाला असला तरी हिंदुस्थानांत त्यांचा जन्म व्हावयाला त्यानंतर आणखी ३७ वर्षे लागलीं. बत्तीस सालच्या लढ्यांत अच्युतरावांच्या पावलांचा आवाज महाराष्ट्राला प्रथम ऐकूं आला. पण त्यांचें प्रथम दर्शन राष्ट्राला ९ ऑगस्ट १९४२ रोजीं झालें. 'भारत सोडा' म्हणून महात्माजींनीं ब्रिटिश सरकारला उद्देशून संतापानें जी डरकाळी फोडली त्या तेजस्वी आरोळीमधून भाई अच्युतराव पटवर्धन हे जन्माला आले.

भूमिगत राहून पावणेचार वर्षे त्यांनीं दडपशाहीला टक्कर देऊन क्रांतीचा विस्तव लक्षावधि तरुणांच्या काळजांत धगधगत ठेवला आणि जनतेच्या स्वातंत्र्याचा झेंडा सलामत राखला! शिवरायापासून टिळक सावरकरांपर्यंत चालत आलेल्या बंडाच्या, क्रांतीच्या आणि पराक्रमांच्या सर्व महाराष्ट्रीय प्रवृत्ति आणि परंपरा अच्युतरावांमध्यें आज देदीप्यमान स्वरूपामध्यें प्रकट झालेल्या दिसून येतात. लोकमान्य टिळकांच्या नंतर अखिल भारतीय कीर्तीचा, कर्तृत्वाचा बंडखोर नेताजी महाराष्ट्राला पुन्हा मिळाला आहे! महाराष्ट्र आज खरोखरच धन्य झाला आहे!

## जय हिंद! जय हिंद!! जय हिंद!!!

प्रणाम!

माता धन्य, पिताहि, बंधु भगिनी ही मायभूमी तशी।
स्वातंत्र्यास्तव प्राण लावुनि पणा, तूं पांगही फेडिशी॥
क्रांतीच्या तर घोषणा नवनव्या, वर्णूं किती थोरवी।
अच्यूता! तुजला 'प्रणाम' करिते ही आज भावी पिढी॥

—गं. स. डांगे

# अच्युतराव पटवर्धन

## [ पोवाडा ]

( शाहीर—पां. द. खाडिलकर, एम्. ए., बी. टी. )



एकोणीसशें बेचाळीस साल । क्रांतिचा जाळ ।
ज्यांनीं भडकाविला कष्ट सोसून । खेडोपाडीं क्रान्ति दिली पसरून ।
शेतकरी जागा ज्यांनीं केला । लढा खडा केला ।
धन्य ते वीर । मति माझी गेली गुंग होऊन ॥ ध्रु० ॥

'चला सोडा हिन्दुस्थान'। बोलला प्राण। भरतभूचा।
तो सिद्ध महात्मा संत। कराया अंत। गुलामीचा॥
"जरि दीडशें वर्षें ब्रिटिशांनों। राज्य तुम्ही केलें।
तरि कल्याण नाहिं पाहिलं। राष्ट्राला पार बुडवलं।
भांडणाचं विष मुरवलं। लोकांचं शौर्य हरपलं।
दारिद्र्य चवताळुन आलं। शस्त्रास्त्र काढुन नेलं
राष्ट्राला गुलाम बनविलं। आतां हें राज्य असह्य झालं।
मुकाट्यानं जावं येथून सांगतों मी भलं॥ जी॥ जी॥ जी॥
द्वेष नसे माझ्या चित्तांत। जुलमाचा अंत।
कराया आलों प्रेम घेऊन। जर म्हणाल आतां तुम्ही न न।
तर लोक करतील काय। नसे मज ठाव।
ऐका ब्रिटिशांनों! लक्ष देऊन॥ जी॥ जी॥ जी॥

(चाल)

पिसाळली मग नोकरशाही। मग पकडायाची झाली घाई।
गांधी महात्मा, पुढारी सारे पकडुनि नेले ठाईं ठाईं।
येरवड्याला भरले कांहीं।
नासिक हिंडलगा शिवणीही विसापुरीं पाठविले कैकाहीं।
भूमीगत होउनिया कांहीं। कार्य साधती ठायीं ठायीं॥

(चाल)

अच्युत गर्भश्रीमंत। परि नसे मुळीं उन्मत्त॥
चैनिचा करुनिया अंत। देशार्थ देह झिजवीत॥
तारुण्य त्यास फुलवीत। गुरफटे मुळि न परि त्यांत॥

(चाल)

नयन करारी। कांपवि वैरी। दीनांचा कैवारी।
भीत निवारी। जो जो झाला आपला वैरी॥
बोध करूनिया त्याला वळवी। हसवी। फुलवी। मग समजावी॥

( चाल )

भूमीगत होउनि करी कार्य अच्युत ॥ जी ॥
सातारा जिल्हा केला त्यानं पसंत ।
आतां चरित्र त्याचं सांगतों घ्यावं चित्तांत ॥ जी ॥

[ २ ]

अहमदनगरिं जन्म झाला । ( ५ फेब्रुवारी १९०९ )
पटवर्धन घराणं त्याला । गर्भश्रीमंती लोळण्याला ।
नाजूक बांधा त्याचा झाला । मैदानी खेळ नकोत त्याला ।
अच्युत शाळेमधीं गेला । पण तिटकारा गणिताचा त्याला ।
कसा बसा मॅट्रिक पास झाला । काकांनीं दत्तक घेतला त्याला ॥ जी
पुढें कॉलेजांत भाऊभाऊ गेले शिकायाला ॥ जी ॥
अच्युत आणि राऊ सख्खे भाऊ हे गेले तंवा काशीला ॥ जी ॥
सेंट्रल हिंदु कॉलेजांत झाले दाखल त्या वेळा ॥ जी ॥
प्रोफेसर अरुंडेल होते ज्ञानदानाला ॥ जी ॥
प्रोफेसर तेलगहि होते ज्ञान देण्याला ॥ जी ॥
तेलंग बुद्धिमत्तेचा ठेवा सकलाला ।
चारित्र्य आणि मानवता साथ देण्याला ॥
दोन शिष्य झाले आवडते दोन सद्गुरुला ॥ जी ॥
अभ्यास पुरा त्यांनीं केला ॥
एम्. ए. ची परीक्षा दिली आनंद झाला ॥ जी ॥
मग अच्युत युरोपला गेला ।
तिथनं जेव्हां अच्युत परत आला ।
तंवा बनारस हिंदु-कॉलेजांत-अर्थशास्त्र शिकवायला ।
प्राध्यापक नेमलं होतं त्याला ।

पण राजकीय चळवळीनं ओढल एकदां अच्युताला ।
१९३० सालाला । राजीनामा देऊन हा वीर मुंबईला आला ।
अन् काँग्रेसच्या कामामधिं पार गढुनियां गेला ॥ जी ॥
सरकारनं दडपशाहीचा सोटा फिरविला ।
अन् कैकांना नेलं तुरुंगाला । त्यांतच नेल होतं अच्युताला ।
पुढं १९३४ सालाला । समाजवादी पक्षाचा होता झेंडा रोवला ।
त्यांत अच्युत सामील झाला ।
तेव्हांपासून अच्युत राष्ट्राचा ताईत झाला ॥

## [ ३ ]

१९४२ साला । जागा केला त्यानं सातारा । प्रतिसरकार संस्थापुन सारा जिल्हा हलविला ॥ नाना पाटील त्याच्या मदतीला । दोनशें वीर मावळा जमविला ॥ अन् ग्रामराज्यें स्थापलीं धडाक्याला । सरकारनं जुलमाचा मोठा कहर सुरू केला ॥ जागोजागीं छापा घातला अन् कैक तरुण पकडुन नेला ॥ दऱ्याखोऱ्यांनीं देशभक्तांना आसरा दिला ॥ शिवाजीनं गनिमी काव्यानं—मोठा शत्रु हैराण केला ॥ तसाच यांनीं प्रकार हा केला । किती शिपाई गेले शोधायला । पण जनतेनं आसरा दिला देशभक्ताला ॥ जी ॥ शिपायांनीं गोळीबार केला । कैक झाले ठार त्या वेळा । पण बंडाच्या ज्वाळा भडकल्या जागजागेला ॥ आज इथं तर उद्यां तिथं—असा प्रकार रोज चालला ॥ शेवटीं अच्युतला पकडुन द्यायला । ५००० रुपयांचं बक्षिस सरकारनं लावलं त्या वेळा ॥ पण सरकारच बक्षिस द्यायला । पुढं कोण येणार हो बोला ? । फितुरांचा नायनाट केला । तें बक्षिस तसच राहिल जागेला । किती आगगाड्या पाडल्या जागजागेला । दोन चारदां खजिना लुटवला । किती

मोर्चे नेले जगिं तोड नाहीं हो त्याला ॥ खजिना लुटवला– पण स्वार्थ न शिवला कुणाला । सारा पैसा देशकार्याला । चैन पडेना सरकारला । तंवा एकदा प्रकार काय झाला । अच्युतला पकडायला । एक खास पोलीस तुकडी रवाना झाली होती साताऱ्याला । पोलीसांनीं बहुत शोध केला । पण अच्युत सांपडेना त्याला । सरतेशेवटीं पोलीस नाईक गाडीतनं परत पुण्याकड चालला । पण योगायोग असा होता आला ! ज्या डब्यातनं अच्युत होता चालला । त्याच डब्यातनं त्याच नाइकाच्या जवळनं अच्युतही होता चालला । पण त्याचा पत्ता नव्हता कोणाला । तो नाईक म्हणतो शिपायाला । जर अच्युत लागला असता हाताला । तर ५००० रु. इनाम मिळालं असत आपणाला । पण ललाटीची रेषा कुठं लोपली ठाव कोणाला ! ॥ जी ॥ अच्युत महा चलाख इसम झाला । अरं आतां हुडकायचं तरी कुठं त्याला ? । अरे जरा जर जवळ असता आला । तर ताडकन पकडलं असतं त्याला । पण लेकानों ! नशीब कुठं गेलयं ठाव कोणाला ? ॥ असं हपीसर बोलला त्या वेळा । अच्युत होता जवळच बसलेला । तरी भीति नाहीं ठावी त्याला । धैर्याचा जणु कांहीं पुतळा । खळबळाट नाहीं ठाव त्याला । गांभीर्य जसं समुद्राला । चपलाई जशी वाऱ्याला । ती चमक जशी विजलीला । प्रखरता जशी अग्निला । शांतता जशी चंद्राला । मोहकता जशी ताऱ्याला । तसा अच्युत महाराष्ट्राचा चमकता हिरा ॥ जी ॥

[ ४ ]

अच्युत प्रगट जंवा झाला । तंवा चौपाटाच्या वाळवंटाला । सत्काराची सभा हज्जारोनीं भरली त्यावेळा ॥ तवा अच्युत वीर गर्जला । आज माझा सत्कार तुम्ही केला । पण हा माझा नसून

ज्यांनीं मला तीन वर्ष आसरा दिला। त्यांचाच सत्कार हा झाला। इंग्रजाचे हुकूम मानायला। आपण तयार नाहीं या वेळा। इंग्रज स्वातंत्र्य नाहीं देणारा। तें आपलं आपणच घेतलं पाहिजे या काळा। गुलामीचा इतिहास नवा नाहीं ठाव सर्वांला ॥ जी ॥ कॉंग्रेसनं गुलामीच्या बेड्या तोडायला। हा लढा सुरू आहे केला। आपलें संघटण वाढतं या काळा। जसा गंगानदीचा ओघ–तसा ओघ शक्तिचा खरा। किती प्रवाह मिळती या नदीला। एक प्रवाह तसाच आंत आला। जसं नदीचं पाणी गढूळ व्हावं–पण शक्ति वाढती त्या वेळा। तसा हा एक नवाच प्रवाह कॉंग्रेसमध्यें आला। क्षणभर वाटती भीती सर्वांला। पण भिण्याचं कारण ना कुणाला। आम्ही समाजवादी हें सांगायला। याची लाज कसली आम्हांला। समाजाचं राज्य व्हावं–लोकांचें राज्य इथं व्हावं–ग्रामराज्य रामराज्य व्हावं–अशी इच्छा फार चित्ताला। समाजाच राज्य तें राज्य वाटत आम्हांला ॥ समाजाच्या शक्तीचा साक्षात्कार मला झाला ॥ लोक सारा खडबडून जागा झाला। स्वराज्याची तहान सर्वांला। खेडेगांवचा लोक जागा झालाय राज्य मिळवायला ॥ जी ॥ त्या शक्तीचा उपयोग करा। असं माझं सांगण पुढाऱ्यांना आज या वेळा ॥ गांधींच्या जवळ राहाण्यानं–समाजवाद कळला हो मला। ग्रामराज्य राष्ट्रांचा खरा पाया हो झाला ॥ जी ॥ स्वराज्य दिल्लींत नाहीं–खेडोपाडीं स्वराज्याचा परमात्मा राहिला ॥ जी ॥ आतां एक गोष्ट सांगतों तुम्हांला। ज्यानीं ज्यानीं–अधिकाऱ्यानीं १९४२ सालाला। आम्हांला फार त्रास दिला। त्यानां शासन झालंच पाहिजे या वेळा ॥ स्वराज्याचा सूर्य उगवेल शंका ना मला ॥ जी ॥

उदंड जीवन लाभो तुजला लोककार्य तें करण्याला ।
शक्ति युक्ति सद्बुद्धि येऊंदेत साहाय्य तुला करण्याला ॥ जी ॥
धैर्य शौर्य तें निर्भयता ही शमदमादि गुण यत्नाला ।
जोड देऊंदेत शाहिर मागे हेंच ईश्वरी चरणाला ॥ जी ॥
अविलंबानें स्वतंत्रतेचा सूर्य येऊ दे क्षितिजाला ।
भारतभूच्या दास्यशृंखला तडातडा तोडायाला ॥ जी ॥
भारतभूचा आवडता तूं आवडता तूं सर्वांला ।
कार्य कराया शक्ति येउदे अमर्याद बळही तुजला ॥ जी ॥
गुणं गावुनिया गौरव करण्या पांडुरंग शाहीर आला ।
गुण गातांना भरती येते माझ्या अंतःकरणाला ॥ जी ॥
हृदयांतिल हे बोल बोललों, कृत्रिमता मुळिं ना त्याला ।
पांडुरंग हा कृतार्थ झाला करुनि तुझ्या या स्तवनाला ॥ जी ।



बा ल मि त्र
द. बा. डावरे
व
अच्युतराव पटवर्धन

# अरुणा असफअली

## : १ :

## स्वातंत्र्याचा अरुणोदय

२६ जानेवारी १९४६ ! स्वातंत्र्यदिन ! याच दिवशीं अरुणा असफअलीवरील पकड-वॉरंट सरकारनें रद्द केलें आणि आपल्या क्रांतिदेवतेचें सार्वजनिक रीत्या दर्शन घेण्यास जनता स्वतंत्र झाली !—अरुणेच्या स्वतंत्रवृत्तीस मात्र यामुळें कदाचित् बंधन पडलें असावें !

९ ऑगस्ट १९४२ पासून जनतेच्या अंतःकरणांत तिजविषयीं कोण कुतूहल, कोण कौतुक आणि कोण प्रेम दाटलें होतें ! तिचें सौंदर्य, तिची तडफ, तिची भरारी, साहस, धाडस, समयसूचकता, कितीतरी अद्भुतरम्य कथांनीं लोक मंत्रमुग्ध झाले होते. खानदानी घराण्यांतील सुखशय्येवर लोळणारी आणि केवळ उंची पोषाखांत वावरणारी एक सुंदर प्रतिष्ठित स्त्री——ती ९ ऑगस्टच्या एका सुप्रभातीं एकाएकीं भूमिगत झाली आणि हिंदुस्तानच्या उत्तर-दक्षिण भागांत नाना वेशानें भटकून हालअपेष्टांत जीवन कंठण्याचा तिनें निश्चय केला. भारताला स्वतंत्र करण्याचें क्रांतिकार्य एवढें एकच ध्येय तिच्या नजरेसमोर होतें. याच ध्येयदीप्तीनें अंतःकरण उजळून निघालेलें होतें. याच दीपानें क्रांतीची अमरज्योति तेवत ठेवण्याचें कार्य तिनें स्वयंस्फूर्तीनें स्वीकारलें होतें. ज्या कुणाच्या हृदयांत तिला क्रांतीचा अंधुक प्रकाश जाणवला त्याचें तिनें ज्योतींत रूपांतर केलें आणि कित्येक अभागी अंधाऱ्या अंतःकरणांना आपल्या तेजस्वी

व्यक्तित्वानें क्रांतीचा प्रकाश दाखवला. "केला जरी पोत बळेंचि खाले । ज्वाळा तरी ते वरती उफाळे" या न्यायानें ब्रिटिशांच्या बलाढ्य साम्राज्य-शाहीविरुद्ध ती हिंदुस्तानांतील सर्वसामान्य जनतेला चेतवीत राहिली.

तिला बघायला, तिचे शब्द ऐकायला, जनता किती अधीर झाली होती! अरुणा व्यासपीठावर हात जोडून आली आणि असंख्य नेत्रांच्या नीरांजनांनीं तिला ओवाळलें! तिला कोणतें हृदय दिसलें? वंग सौंदर्याची खनि अरुणा अत्यंत साध्या वेशांत समोर उभी होती! तिची अंगकांति (लाक्षणिक अर्थानें) अंधारांत राहिल्यामुळेंच कीं काय, जरा काळवंडलेली वाटली. आणि तिचा आवाज? कांहीं विशेष परिणामकारक वाटला नाहीं. जरा चिडकेपणा-कडेच झुकणारा-कोताच म्हणाना! त्यांत सरोजिनीची काव्यमय नादमधुरता नव्हती किंवा कमलादेवीचें गोड गंभीर मार्दवही नव्हतें. पण तो तिचा - अरुणेचा - महान् तेजस्विनीचा स्वर होता. त्याचें एकमेव वैशिष्ट्य—तिच्या जीवनाचें प्रतिबिंब—त्यांत जनतेला दिसलें. तिची वाणी अस्खलित नसली, तरी प्रत्येक शब्द कळकळ आणि थोर प्रांजलपणा यांनीं खणखणत होता. दरेक मुद्दा, विचार स्पष्ट, सहज, सुंदर—आणि या सर्वांवर तिच्या स्वतंत्र, निर्भय व्यक्तित्वाचा अपूर्व ठसा उठलेला होता.

जनता स्वयंस्फूर्तीनें उद्गारली,

"हा आमच्या स्वातंत्र्याचा अरुणोदय"!

✤ ✤ ✤

## : २ :

## लढ्याचा श्रीगणेशा

अभिजात स्वतंत्र निर्भय वृत्ति हेंच अरुणेचें जीवनकेंद्र! अगदीं लहाणपणापासून तिच्या या गुणाचा प्रत्यय तिच्या नातेवाइकांना आणि भोंवतालच्या मंडळीला येत गेला आहे. ती १४ वर्षांची असेल नसेल, तिनें एक निश्चय केला होता. ती लाहोरला ज्या मिशनरी शाळेंत शिकत होती तेथली सिस्टर ही एक कर्मठ पण अत्यंत प्रभावी व्यक्तित्वाची स्त्री होती. तिच्या सान्निध्यांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचें अंतःकरण ती तात्काळ आकर्षून घेई. अरुणेला तिनें जवळ केलें. तिला तिनें येशू ख्रिस्त, मेरी, यांचीं चरित्रें वाचायला द्यावींत, बायबलमधील अनेक गोष्टी परिणामकारकतेनें सांगाव्यात. जगांत, द्वंद्व-लढा हा सदोदित चालू असतो म्हणून प्रत्येकानें आपलें जीवन पवित्र राखून अखेर ईश्वरार्पण करावें, असेंहि तिचें प्रतिपादन असे. अरुणेच्या तल्लख कल्पनाशक्तीवर याचा व्हायचा तोच परिणाम झाला. तिनें सन्यासिनी होण्याचें ठरविलें! आपल्या चिमुकल्या मस्तकांतील हा गंभीर निश्चय तिनें वडील मंडळीला कळवला. अर्थात् त्यांनीं तिला त्या 'भयंकर' शाळेंतून काढून तिची बहीण पूर्णिमा शिकत होती, तिथें—नैनितालला धाडून दिलें!

एकूण सिस्टरचें प्रतिपादन खरें तर! निदान छोट्या अरुणेला तरी त्याचें चांगलेंच प्रत्यंतर आलें! त्यावेळीं अरुणा कोण संतप्त, अस्वस्थ झाली होती!

## : ३ :
## विवाह-योग

या चकमकीनें तिच्या जीवनांतील लढ्याचा प्रारंभ झाला. नंतर कांहीं महिन्यांनीं लवकरच दुसरा समरप्रसंग उद्भवला. कदाचित् मागच्याच अनुभवानें असेल.—पण अरुणेनें या खेपेस एक नवीनच मार्ग आक्रमायचें ठरवलें. सर्वच आईवडिलांप्रमाणें तिच्याहि आई-वडिलांची, तिचें योग्य वेळीं आणि रीतसर लग्न करून द्यावें अशी स्वाभाविक इच्छा होती. पण रुळलेल्या मार्गानें गेली तर ती अरुणा कसली ? तिनें आईवडिलांच्या इच्छेस साफ नकार दिला. आणि स्वतंत्र राहायचें ठरवलें. अर्थात् विरोध जोराचा झाला. तथापि कोणत्याही संकटास न जुमानतां ती तडक कलकत्त्याला गेली आणि तिथें तिनें गोखले मेमोरिअल मुलींच्या शाळेंत शिक्षिकेचें काम पत्करलें. आपली उपजीविका तर ती याप्रमाणें स्वतंत्रपणें करूं लागलीच. पण तिचा आणखीही एक बेत होता. पैसा साठवून पुढील शिक्षणाकरितां इंग्लंडला जायचें स्वप्न ती पाहूं लागली !

पण विधिघटना निराळी होती. " मनसा चिंतितं एकं —" याचा तिला आणखी एकदां अनुभव घ्यावा लागला. पुन्हां एक युद्ध उद्भवलें. पण हें युद्ध मदनाच्या साम्राज्यांतलें असल्यामुळें जितकें नाजुक तितकेंच निर्धाराचें ठरलें ! कलकत्त्याला शाळेंत असतानांच एका सुटींत ती अलाहाबादला आपल्या वडील बहिणीकडे—पूर्णिमा बानर्जीकडे आली होती. तिथें तिची बॅरिस्टर असफअल्लींशीं गांठ पडली. ओळख झाली. आणि मदनानें आपलें लक्ष्य वेधलें. असफअल्लींचें प्रतिभावान्, काव्यात्म अंतःकरण आणि

अरुणा ही रूपगुणांची खाण! "विशिष्टायाः विशिष्टेन संगमो गुणवान् भवेत्" या न्यायानें दोघेंही परस्परानुसक्त झालीं!

पण या खेपेस वडीलधाऱ्यांचा विरोध असाधारण ठरला. कारणही तसेंच होतें. कोंवळी अरुणा अवघी १८ वर्षांची तर बॅरिस्टर असफअली ४० शी उलटलेले,—४१ वर्षांचे! हा जोडा कुणालाही झाला तरी कसा मानवावा? त्यांतून "गंडस्योपरि गंडः' या न्यायानें, अरुणा, हिंदूच नुसती नव्हे तर अगदीं ब्राह्मण—आणि असफअली पाक मुसलमान!

पण जगद्विख्यात टागोर कवीची ही नात,—तिच्या जीवनांत काव्य उमलूं लागलें होतें! सारीं बंधनें तोडून टाकून, सारा विरोध धुडकावून, स्वतंत्र, निर्भय, निश्चयी अरुणा गांगुली १९२७ सालीं अरुणा असफअली होऊन दिल्लीनिवासी बनली!

इतका विरोध जिनें धुडकावून लावला तिला भाषेचें बुजगावणें काय होय? आपल्या सासरची उर्दू भाषा तिनें आपल्या प्रेमळ सासूच्या साह्यानें लवकरच आत्मसात् केली आणि पतीनें तिच्यावर केलेल्या काव्याचा आस्वाद ती घेऊं लागली!—या तिन्हीही बहिणी अरुणा असफअली, पूर्णिमा बॅनर्जी आणि नंदिता कृपलानी—अशाच आपापल्या परीनें ईश्वरी देणगीनें युक्त, अद्वितीय आणि अष्टपैलु आहेत!

❖ ❖ ❖

## : ४ : तुरुंगाची यात्रा

१९३० च्या असहकाराच्या हाकेनें अरुणेचें काव्यमय जीवन विचलित झालें. तिची स्वतंत्र वृत्ति जागृत झाली;—उसळून आली. त्या सुमारास १८५७ च्या बंडाबद्दल एक भाषण केल्यामुळें दिल्लीचा चीफ कमिशनर तिच्यावर खूप संतापला.

चांगल्या वर्तणुकीबद्दल त्यांनें तिच्याकडून जामीन मागितला. अर्थात ही गोष्ट स्वतंत्र बाण्याच्या अरुणेनें धिकारली! तेव्हां चीफ कमिशनरनें तिला १ वर्षाची कैद फर्मावली.

अरुणा आपल्या बरोबरच्या स्त्री-कैद्यांत फार लोकप्रिय झाली होती. सर्व कैद्यांचें जीवन नित्याप्रमाणें चालू होतें. इतक्यांत गांधी-अर्विन करार झाला. त्या करारान्वयें सर्व राजकीय कैद्यांना मुक्त करण्याचा हुकूम सुटला. सर्वांची सुटका झाली. पण अरुणेला मात्र लोखंडी दरवाजा ओलांडण्याची मनाई केली गेली. तेव्हां साहजिकच बाकीच्या स्त्रियांनींही तुरुंगाबाहेर पाऊल टाकायला साफ नकार दिला. मोठाच पेचप्रसंग निर्माण झाला. तुरुंगांत जुलमानें डांबण्यापेक्षां तुरुंगाच्या बाहेर आणणें एवढें कठीण तर! अखेरीस गांधीजी आणि डॉ. अन्सारी यांनीं मध्यस्थी केली आणि तुरुंगानें गिळलेलीं माणकें तुरुंगानेंच बाहेर टाकलीं! पण तें मुख्य माणिक—अरुणा! एकटीच आंत राहिली. जनता अत्यंत प्रक्षुब्ध झाली! तरीही कांहीं दिवस सरकारनें दाद दिली नाहींच! पण रत्न गिळल्यानें मरण आलें असतें ना?—सरकारनें तिला मुक्त केलें.

तुरुंगवासाची ही तिला मिळालेली पहिली चुणूक—आणि सरकारलाही तिनें आपल्या तेजस्वितेची दाखवलेली ही पहिलीच चुणूक!

नंतर १९३२ सालीं तिला पुन्हा शिक्षा झाली आणि जोडीस दंडही ठोठावला! दंडाची रक्कम अर्थात् भरली गेली नाहीं. तेव्हां पोलीसांनीं एक सुंदर युक्ति काढली. तिच्या भारीभारी साड्यांवर त्यांनीं झडप घातली आणि ठरलेल्या २०० रु० दंडाच्या रकमेपेक्षां

कितीतरी अधिक वसुली करून घेतली!—मला वाटतें, म्हणूनच तेव्हांपासून ती अगदीं साध्या साड्या परिधान करीत असावी!

ही शिक्षा भोगीत असतांना तुरुंगांत एक नवीन प्रश्न उपस्थित झाला. राजकीय कैद्यांना गुर्मीची बेगुमान वागणूक मिळे. त्याविरुद्ध अधिकाऱ्यांकडे तक्रारी गेल्याही. पण शासनसंस्थेचे कान नुसते लांबच असून चालत नाहीं, ते तीव्रही असावे लागतात. पण ते तसे नसल्यामुळें अरुणेनें अन्नसत्याग्रह पुकारला. तिची प्रकृति दिवसानुदिवस ढांसळूं लागली, तरी अर्थात् तिचा निश्चय उत्तरोत्तर वाढतच होता. शेवटीं अधिकाऱ्यांना आपली मगरूरी कमी करणें भाग पडलें. राजकीय कैद्यांच्या कांहीं मागण्याही त्यांनीं पुरवल्या. पण या अपमानाचा सूड त्यांनीं अरुणेवर उगवला. अंबाला येथील पुरुषांच्या बंदीखान्यांत तिची रवानगी केली गेली!

## : ५ : लढ्याची तयारी

३२ साल संपलें आणि वातावरणांतील असहकार ओसरला. पुढें १९४० सालीं तिला आणखी एकदां सरकारचा पाहुणचार भोगावा लागला, पण मग तोंवर ती अगदीं शांत, स्थिर दिसूं लागली. तिचें जीवन बाह्यात्कारी तरी बरेंच बदललेंसें वाटलें. ती घरींच राहूं लागली. तुरुंगांत असतांना असफअलींच्या मुलांकडे बघायला कोणी नसे, तेव्हां अरुणेची आई, ती प्रेमळ माता दिल्लीस असफअलींकडे येऊन राहात असे. जातिभेदाच्या मर्यादा प्रेम ओळखत नाहीं हेंच खरें! अरुणेनें पुन्हा सारी जबाबदारी शिरावर घेतली. पण ती नुसती घरीं बसून राहाणें शक्यच नव्हतें.

अ. भा. म. परिषदेच्या कामांत ती उल्हासानें लक्ष घालूं लागली. परिषदेच्या बैठकी, स्त्रियांच्या सभा, संमेलनें, सहकारी दुकानें, जिकडे तिकडे अरुणेचें व्यक्तित्व बोलूं चालूं लागलें. समाजाच्या कोणत्याही थरांतील स्त्रियांशीं तिचें वर्तन अगदीं खेळीमेळीचें, आपुलकीचें असे. आपला दर्जा, आपली श्रीमंती, आपलें रूप,—तिला यांची कधींच अठवण होत नसे. महाराष्ट्रीय भगिनींशीं बोलतांना तोडकें मोडकें मराठी वापरल्यावांचून ती कधीं राहिली नाहीं. आणि महाराष्ट्रीय नेसण्याबद्दल तर तिला कोण आकर्षण ! तिच्या, साध्या प्रेमळ स्वभावाच्या, कळकळीच्या कर्तृत्वाच्या किती तरी रमणीय गोष्टी दिल्ली येथील महाराष्ट्रीय भगिनींना आठवतात—अगदीं कालच्या वाटतात !

पण तिचें अंतर्मन निराळ्याच क्षेत्रांत वावरत होतें. राजकीय विषयांचें वाचन आणि मनन करून तिची मानसिक तयारी जनतेच्या दृष्टीआड चालू होती. ही ८–१० वर्षें तिचीं राजकारणाच्या अभ्यासांत व्यतीत झालीं. तिला कॉंग्रेस संघटनेविषयीं बरीच आंतरिक माहिती मिळालेली होती. असहकाराच्या चळवळींत प्रत्यक्ष उडी घेतल्यामुळें कॉंग्रेसच्या तत्वज्ञानाची, साधनाची खोली, तिथले खांचखळगे तिला जवळून पाहातां आले. त्यांतले दोष, उणीवा तिला तीव्रतेनें जाणवल्या. यासंबंधीं स्वतःच्या मनाशीं तिनें कांहीं निश्चय केला. स्वातंत्र्य लढ्यासंबंधीं स्वतःच्या अनुभवाच्या पार्श्वभूमीवर तिनें कित्येक कल्पना आणि कार्यक्रम यांची आंखणी केली.—आणि त्या गोष्टी कसास लावण्याचें भाग्य व संधि तिला लवकरच प्राप्त झाली. १९४२ च्या "भारत छोड दो" या

गांधीजींच्या क्रांतिमंत्रानें तिनें पुन्हा राजकीय रणांगणावर पाऊल टाकलें;—आणि—

तिच्या जीवनांतील शेवटचा आणि सर्वश्रेष्ठ लढा आतां सुरू झाला.

परंतु या राजकीय लढ्याचें तंत्र सर्वस्वी अभिनव, अद्भुतरम्य आणि अलोट धाडसाचें होतें—पूर्णपणें 'स्वतंत्र' होतें !

✤　　✤　　✤

## : ६ :
## भूमिगत चळवळ

९ ऑगस्ट १९४२ रोजीं पहांटे गांधी-नेहरू प्रभृति राष्ट्रवीरांना बोरीबंदरवरून लष्करी पाहाऱ्यांत अज्ञात स्थळीं नेतांना तिनें पाहिलें, ती परतली, तों थेट गवालिया टँक मैदानावर थडकली ! अजून झेंडावंदन व्हायचें होतें. तिनें "झेंडा ऊंचा" धरला—आणि पोलिसांनीं अश्रुधूर, लाठी व गोळ्या यांचा वर्षाव केला. ती निघाली—गर्दींतून वाट कांपीत चालली. दहाच मिनिटांनीं सहज मागें वळून पहाते तों मगाशीं प्राण पणास लावून फडकावलेला राष्ट्रीय तिरंगी ध्वज एक सार्जंट बेगुमानपणें पायदळीं चुरडीत, तुडवीत होता !

"ठीक आहे ! ब्रिटिश सत्ता मीही अशीच पायानें तुडवीन, ठोकरीनें उडवीन" असा त्याक्षणीं तिनें निर्धार केला—आणि ती अदृश्य झाली ! त्याच अदृश्यतेंत तिच्या स्वतंत्र वृत्तीचा आणि बुद्धीचा—या अदृश्य शक्तींचा साक्षात्कार—अखिल राष्ट्रास जाणवला !

सतत तीन वर्षें तिचें अदृश्य जीवन जनता पाहात होती, ऐकत होती, अनुभवीत होती. पाहून हर्षभरित होत होती, ऐकून

चकित होत होती, अनुभवून अभिमानानें फुलून जात होती! आणि अरुणा? तीही सुखांत होती. पण तें सुख कसलें होतें? देहावर वार झेलीत ध्येयमार्गानें जाणाऱ्या वीरवृत्तीचें! किती वेळां तिचें शरीर कृश झालें, व तिला किती तरी जर्जर केलें, तरी तिच्या मुखावरचें हास्य आणि अंतःकरणांतला उत्साह कधीं मावळला नाहीं. ती नेहमींच्याच उल्हासानें आपल्या अज्ञातवासांतील सहकाऱ्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था पाही आणि 'इन्किलाब' या वृत्तपत्राचें संपादनही करी! गृहिणी आणि मित्र या दोन्हींतील गुण तिच्यामध्यें एकवटलेले पाहून तिच्या सहकाऱ्यांना काय वाटलें असेल! अच्युत पटवर्धन, डॉ० राम मनोहर लोहिया आणि जयप्रकाश नारायण यांच्या सारख्या अचाट सामर्थ्याच्या व्यक्तींशीं तिला नेहमीं सहकार्य करावें लागे. कर्तृत्वांत ती कधीं मागें पडली नाहीं!

स्वतःच्या आजारापेक्षांही स्वकीयांचा मृत्यु ही केवढी असह्य आपत्ति! त्यांतून मातेचा मृत्यु! आपल्या थोर, उदार अंतःकरणाच्या प्रेमळ मातेस अज्ञातवासामुळेंच केवळ अरुणा वेळेवर भेटूं शकली नाहीं! त्या दुःखाचें वर्णन कोणी करावें?

❖ ❖ ❖

## : ७ : व्यक्तिदर्शन

जयप्रकाश, राम मनोहर लोहिया आणि अच्युत पटवर्धन हे तिचे प्रत्यक्ष सहकारी. त्यांच्याबरोबर तिचें नांव सतत उल्लेखिलें जातें, पण त्यांच्यापेक्षां अरुणेचें व्यक्तित्व जरा निराळें आहे. या तिच्या समाजवादी सहकाऱ्यांप्रमाणें तिची वैचारिक भूमिका प्रथम-पासून ठाम निश्चित बनलेली नव्हती. ती या चळवळींत जशी स्वयंस्फूर्तीनें पडली—तशीच "समयस्फूर्ति" हीही तितकीच तिची

प्रेरक ठरली. तें वातावरणच असें होतें कीं, तिचें भावनामय अंतःकरण एकदम आकर्षित झालें. ती फारसा विचार करीत बसत नाहीं. अंतःप्रेरणेवर तिचा अधिक विश्वास आहे. म्हणूनच, ज्या चळवळीशीं लहान–थोर, स्त्री–पुरुष, गरीब–श्रीमंत, सर्व थरांतले आणि सर्व वर्गांतले लोक या ना त्या नात्यानें निगडित झाले होते, तिच्याशीं अरुणा एकरूप झाली. आणि मग अर्थातच थोर थोर विचारशील सहकाऱ्यांबरोबर दैनंदिन काम करतांना तिच्या कर्तृत्वास एक विशिष्ठ बैठक प्राप्त होऊं लागली. जातिवंत कलावंतानें रंग आणि कुंचला घेऊन फलकावर कांहीं बऱ्याचशा रेघोट्या ओढाव्या—आणि कालांतरानें त्यांत एकादी सुंदर आकृति प्रेक्षकाला प्रतीत व्हावी, तसेंच कांहींसें अरुणेच्या बाबतींत होऊं लागलें.

अरुणा पूर्णपणें समाजवादी आहे किंवा नाहीं, कांहीं सांगतां यावयाचें नाहीं. पण एवढें मात्र खरें कीं, तिचा ओढा समाजवादाकडे आहे. ती कधीं राजकारणाच्या आखाड्यांत, गलबल्यांत, उतरलेली नाहीं, म्हणूनच तिचें राजकीय व्यक्तित्व अतिशय शुद्ध राहिलेलें आहे. तिची तळमळ, तिचा उत्साह आणि विशेष म्हणजे तिचा निःस्वार्थी स्वभाव, याच गुणामुळें ती राजकारणाकडे आकर्षित झाली आणि म्हणूनच जनताही तिच्याकडे अतिशय आदरानें पाहूं लागली आहे. भारतमातेच्या हांकेसरशीं या तिच्या सुकन्येनें संकटांत उडी घेतलेली आपण पाहिलीच आहे.

अजूनही देशाला तिच्या साह्याची गरज आहेच. तिचें जीवनचरित्र पाहातां ती यापुढें अशीच आपल्या मायभूमीच्या साह्यास येईल असाच विश्वास वाटतो !

२३८५
IRBK-0102385

# पटवर्धन घराणें



पहिली रांग—(१) श्री. पद्माकर (२) भाई अच्युतराव (३) रावसाहेब (४) श्री. वासुदेवराव (५) श्री. मधुकरराव

दुसरी रांग—(१) कु. गोळे (२) सौ. माणिकबाई (३) मातश्री (४) सौ. [illegible]ई (५) [illegible] विजया.